लिपिक टंकलेखकाच्या संवर्गामधून अव्वल कारकून पदावरील पदोन्नतीसाठी लागू करण्यात आलेल्या महसूल अर्हता परिक्षेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक परिक्षा-१२८५/२७७५/प्र.क्र.३३९/(भाग-२)/ई-७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ ऑक्टोबर, १९९९.

**शासन निर्णय :**

राज्यातील लिपिक टंकलेखकाच्या संवर्गामधून अव्वल कारकून पदावरील पदोन्नतीसाठी क्रमांक-परीक्षा-१२८५/२७७५/प्र.क्र.३३९/(भाग-२)/ई-७, दिनांक ७ जुलै, १९९९ च्या अधिसूचनेन्वये लिपिक टंकलेखक संवर्गामधून अव्वल कारकून पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महसूल अर्हता परीक्षा नियम, १९९९ लागू करण्यात आले आहेत. सदर नियमांतील तरतुदीनुसार संबंधित विभागीय आयुक्तांमार्फत सदर परीक्षा घेण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने प्रश्नपत्रिका काढणे, उत्तरपत्रिका तपासणे, परिक्षेचे मानधन ठरविणे इत्यादी बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या. या संदर्भात सर्वंकष विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतले आहेत :-

१) महसूल अर्हता परिक्षेच्या प्रश्नपत्रिका तयार करणे व उत्तर पत्रिका तपासणे यांची जबाबदारी जिल्हाधिकारी यांचे नियंत्रणाखाली अपर जिल्हाधिकारी/उपजिल्हाधिकारी यांच्यावर सोपविण्यात यावी. विभागीय आयुक्तांनी प्राश्निक व परिक्षक यांची नियुक्ती करावी.

२) प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका यांची छपाई शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाकडून करून घेण्यात यावी.

३) महसूल अर्हता परिक्षेसाठी पुढीलप्रमाणे मानधन विहीत करण्यात येत आहे.

अ) प्राश्निक - रु.१५०/- ( १०० मार्कांच्या प्रश्नपत्रिकेसाठी )
ब) परिक्षक - रु. ३/- (१०० मार्कांच्या प्रती उत्तरपत्रिकेसाठी)
क) केंद्र प्रमुख रु.४५/- (प्रती सत्र)
ड) समवेक्षक रु.३५/- (प्रती सत्र)
ई) शिपाई रु.१५/- (प्रती सत्र )

४) महसूल अर्हता परिक्षेसाठी येणारा खर्च मागणी क्रमांक सी-७-२०५३-जिल्हा प्रशासन १०१ आयुक्त या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. आवश्यकतेनुसार चारमाही/आठमाही अंदाजपत्रकामध्ये जादा अनुदानासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

५) सदर शासननिर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १०४६/९९ व्यय-९, दिनांक १४.१०.९९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( गीता दिवाडकर )
शासनाचे उपसचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त